# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ / चैत्र ३, १९४८ (शके)**

**(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री**
**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(७) वस्त्रोद्योग मंत्री**
**(८) सहकार मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

---

### नाशिक जिल्ह्यातील खिर्डीसाठे डोंगरगाव आणि खडकओझर लघुपाटबंधारे प्रकल्पांचा महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत समावेश करण्याबाबत

**(१) * ६७३८ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील खिर्डीसाठे, डोंगरगाव व तसेच खडक ओझर लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांची निकड लक्षात घेवून, सदर कामांचा महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा १ मध्ये समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री,जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचेकडे दिनांक १२ जानेवारी, २०२५ आणि दिनांक ९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त प्रकल्पांच्या कामांचा महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा १ मध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, खरे आहे.

खिर्डीसाठे, डोंगरगाव व खडकओझर ल.पा. प्रकल्पांच्या कामाची निकड लक्षात घेऊन या कामांना महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा १ मध्ये समावेश करण्याबाबतचे मा.श्री.छगन भुजबळ, मंत्री,

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण महाराष्ट्र राज्य यांचे मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांना दिनांक ०५/०३/२०२५ रोजी दिलेले निवेदन शासनास प्राप्त आहे.

(२) खिर्डीसाठे, डोंगरगाव व खडकओझर ल.पा. प्रकल्पांना शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.१४०/निवसं-१ दिनांक १४/०३/२०२४ अन्वये महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत टप्पा २ अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रथम टप्प्यातील प्रकल्पांचे नियोजन पूर्ण झाले असून निधीच्या उपलब्धतेनुसार द्वितीय टप्प्यातील कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यात तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याबाबत

**(२) * ७७७१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्याचा आकांक्षित जिल्ह्यात समावेश असून, सदर जिल्ह्यात अद्यापपर्यंत तांत्रिक ज्ञान देणाऱ्या संस्था सुरु झाल्या नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासाची प्रतिक्षा करावी लागत असून त्यामुळे केवळ पारंपारिक संस्थांमध्ये शिक्षण घ्यावे लागत असल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालये असून तंत्रज्ञानाला विशेष महत्व प्राप्त झालेले असताना तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण होत नसल्यामुळे युवकांना तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी अन्य जिल्ह्यात जावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची गरज असून आधुनिक काळात जवळपास सर्वच क्षेत्रात संगणकीकरण, ॲप विकसित करुन काम सोपे करण्याचा प्रयत्न केला जात असताना जिल्ह्यातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञानच मिळत नसल्याने शासनस्तरावरुन राबविण्यात येत असलेल्या ऑनलाईन योजना अथवा ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा फायदा युवकांना घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात दर्जेदार तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत गडचिरोली जिल्ह्यात अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा इन इंजिनिअरींग) अभ्यासक्रमाची १ शासकीय व १ विनाअनुदानित व औषधनिर्माणशास्त्र पदविका (डी.फार्मसी) अभ्यासक्रमाच्या २ विनाअनुदानित तसेच, व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमबीए) अभ्यासक्रमाची १ विनाअनुदानित अशा तांत्रिक शिक्षण देणाऱ्या एकूण ५ शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.

(४) गडचिरोली जिल्ह्यामध्ये तांत्रिक शिक्षण देणाऱ्या एकूण ५ शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी त्यांच्या "युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट

ऑफ टेक्नॉलॉजी, गडचिरोली" या संस्थेमध्ये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे अर्ज केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदूर मधमेश्वर (ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) प्रकल्पांतर्गत काँक्रीट अस्तरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३) * ७९०६ श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत (ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) काँक्रीट अस्तरीकरणाच्या (लायनींग) कामास ११ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, सदर कामास केवळ ८ दिवसांतच तडे गेल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातील कामाचा दर्जा, मोजमाप व देखरेख याबाबत शेतकऱ्यांनी तक्रारी करुनही मुख्य अभियंता यांनी दुर्लक्ष केले असून प्रकल्पाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊन पिके वाया जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने तेथील लाभधारक शेतकऱ्यांनी संबंधित अभियंत्यांकडे लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काम अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे झाल्याचे लक्षात आल्याने ठेकेदाराने काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने ११ कोटी रुपयांचा खर्च मंजूर करण्यात आलेल्या नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या काँक्रीट अस्तरीकरणाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत (ता.वैजापूर) कालवा काँक्रीट अस्तरीकरणाच्या सुमारे २०० मी. लांबीतील कामाच्या काही भागावर भेगा (Temperature Cracks) दिसून आल्या असून सदर भेगा किरकोळ स्वरूपाच्या आहेत. सदरची आवश्यक ती दुरुस्ती निविदेतील अटी शर्तीनुसार संबंधित कंत्राटदाराच्या खर्चाने करण्याची कार्यवाही गुणनियंत्रण विभागाच्या देखरेखीखाली क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

प्रकल्पाच्या निकृष्ट कामामुळे पिके वाया जाण्याबाबत लाभधारक शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त नाही. तथापि, शेतकऱ्यांकडून कालव्याचे काँक्रीट अस्तरीकरण न करणेबाबत तसेच अस्तरीकरणात पॉलिथिनचा वापर न करण्याबाबतची निवेदने क्षेत्रिय स्तरावर प्राप्त आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# सुनसगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) परिसरातील शेतीसाठी वाघूर धरणाचे पाणी सोडण्याबाबत

**(४) * ७९७८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुनसगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) परिसरातील रब्बी हंगामातील पिके पूर्णतः कालव्याच्या पाण्यावर अवलंबून असून, वाघूर धरण प्रकल्पाच्या उजव्या कालव्याला पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम वाया जाणार असल्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुनसगाव ग्रामपंचायत व स्थानिक शेतकऱ्यांनी कालव्याला आवर्तनाने (पाणी सोडणे) पाणी देण्याबाबत संबंधित प्रशासनाकडे वारंवार निवेदने दिली असूनही प्रशासनाकडून अद्याप आवर्तन पाणी सोडण्यात आले नसल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कालव्याची सध्याची पाणीसाठा स्थिती, उपलब्ध पाण्याचे नियोजन व आवर्तनाचे वेळापत्रक काय आहे, तसेच रब्बी पिकांचे नुकसान टाळण्यासाठी उजव्या कालव्याला तातडीने पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

वाघूर धरणाच्या लाभक्षेत्राकरीता माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये रब्बी हंगामासाठी विभागीय कार्यालयामार्फत जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यात आले. त्याअनुषंगाने उजवा कालवा व पाटचारीमध्ये पाणी सोडण्याबाबत सुनसगांव ग्रामपंचायत कार्यालय व स्थानिक शेतकऱ्यांकडून दिनांक ०८/१२/२०२५ रोजीचे निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर प्राप्त मागणी ही एकूण लाभक्षेत्राच्या सुमारे १.२० टक्के इतकी अत्यल्प असून उजवा कालवा व त्यावरील मायनरच्या लाभक्षेत्रात विखुरलेल्या स्वरूपात असल्याने तांत्रिकदृष्ट्या पाण्याचे आवर्तन सोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होणार असल्यामुळे आवर्तन देण्यात आलेले नाही.
(३) वाघूर धरणामध्ये ऑक्टोबर २०२५ मध्ये १०० टक्के पाणीसाठा झालेला असून प्रकल्पांतर्गत एकूण ३६३ द.ल.घ.मी. पाणीवापरापैकी २१५.७० द.ल.घ.मी. पाणी सिंचनासाठी राखीव आहे. वाघूर उजव्या कालव्यावरील १५९६.७० हेक्टर लाभक्षेत्रासाठी त्यापैकी सुमारे १४.७२ द.ल.घ.मी. पाण्याची तरतूद आहे. सद्य:स्थितीत उजव्या कालव्यासाठी संकल्पित १४.७२ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत शेळीपालन व मेंढीपालन व्यवसायांचा समावेश करणेबाबत

**(५) * ८०७९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२५ मध्ये मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन व इतर व्यवसायांचा समावेश करण्यात आला असून, अद्याप शेळीपालन व मेंढीपालन या व्यवसायांचा सदर योजनेत समावेश करण्यात आला नसल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या PMEGP योजनेत शेळीपालन व्यवसायाचा समावेश असतानाही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत उक्त व्यवसायाचा समावेश न केल्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार व लघुउद्योग सुरू करण्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशात शेळयांच्या संख्येच्या दृष्टीने राज्य चौथ्या क्रमांकावर असून, या क्षेत्रासाठी राज्य शासनाची कोणतीही प्रभावी योजना उपलब्ध नसल्यामुळे तरुण उद्योजकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक अडचणी येत असून त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेळीपालन व मेंढीपालन व्यवसायांचा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत योजनेत समावेश करण्याकरीता आवश्यक ते धोरणात्मक बदल व सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पात्र घटकांमध्ये कुक्कुट पालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल/ढाबा शाकाहारी/मांसाहारी पदार्थ विक्री व्यवसाय, होम-स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतूकीकरीता बोट व्यवसाय या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेतून गाई/म्हशी, शेळी/मेंढी पालन या संबंधित व्यवसायांकरीता वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजना राबविण्यासाठी त्यांना राज्य योजना तसेच जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त होतो. सदर योजनांचा ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण लाभ घेवू शकतात.

(३) हे खरे नाही.

राज्यात शेळी व मेंढी व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही राज्यस्तरीय तसेच जिल्हा वार्षिक योजना म्हणून राबविण्यात येते. तसेच सदर विभागाकडून राजे यशवंतराव होळकर महामेष योजना, राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील

मेंढपाळ कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यासाठी चराई अनुदान देण्यात येते.

(४) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत शेळीपालन व मेंढीपालन व्यवसायासाठी मार्जिन मनी अनुदानाचा लाभ द्यावयाचा झाल्यास लाभार्थ्यांकडून त्याच-त्याच पशुधनावर दुबार लाभ घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेळीपालन व मेंढीपालन व्यवसायाचा समावेश मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनेंतर्गत केल्यास युवकांच्याकडून नवनवीन तंत्रज्ञानावर आधारीत विविध क्षेत्रातील प्रकल्पाच्या उभारणीवर मर्यादा येऊन योजनेच्या उद्दिष्टास बगल देण्यासारखे होईल. याकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेंतर्गत शेळीपालन व मेंढीपालन व्यवसायासाठी लाभ देणे योग्य होणार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील क्रीडा शिक्षक व दिव्यांग विद्यार्थी अध्यापन शिक्षक पदभरती करण्याबाबत

**(६) * ८३०९ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांसाठी क्रीडा शिक्षकांच्या ४८६० पदांना मंजुरी दिली असून ठाणे जिल्हा परिषद शाळांमध्ये क्रीडा शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने समूह साधन केंद्रनिहाय क्रीडा शिक्षक व दिव्यांग विद्यार्थी अध्यापन शिक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना नियमित क्रीडा व शारीरिक तंदुरुस्ती विषयक उपक्रमाचा लाभ मिळणार असल्याने ठाणे जिल्ह्यासाठी आकृतीबंधानुसार १०३ क्रीडा शिक्षकांची पदे मंजूर करण्यात आली असून ठाणे जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या १,३२८ प्राथमिक शाळांमधील सुमारे साडेसात लाख विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ होणार आहे तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विशेष शिक्षक नियुक्त केल्यास त्यांचे शैक्षणिक समावेशन अधिक प्रभावीपणे होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या १०३ क्रीडा शिक्षक पदांची भरती प्रक्रिया सुरू झाली असून अद्यापपर्यंत किती क्रीडा शिक्षकांची प्रत्यक्ष नियुक्ती करण्यात आलेली आहे तसेच दिव्यांग विद्यार्थी अध्यापन शिक्षकांच्या नियुक्तीबाबत शासनाकडून कोणते आदेश/निर्देश प्राप्त झाले आहेत व त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या समूह साधन केंद्रांची संख्या ४८६० इतकी असून या केंद्रावर विशेष शिक्षक (क्रीडा) व विशेष शिक्षक (दिव्यांग विद्याथी अध्यापन) संवर्गातील प्रत्येकी १ पद मंजूर करण्यात

आले आहे. विशेष शिक्षक (दिव्यांग विद्याथी अध्यापन) या संवर्गातील ४८६० पदांपैकी २९८४ पदे भारतीय पूनर्वसन परिषद (RCI) अर्हताधारक व कंत्राटी तत्वावर कार्यरत उमेदवारामधून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे व मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने भरण्यात आली आहेत. उर्वरित पदे भरण्यासाठीची कार्यवाही करण्यात येत आहे.

विशेष शिक्षक (क्रीडा) या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम व सेवाशर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत असून त्यानंतर या पदांवरील भरती व नियुक्तीबाबत निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांतर्गत प्रत्येक समूह साधन केंद्रासाठी क्रीडा शिक्षकाची नेमणूक करण्याबाबत

**(७) * ८३४५ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत आता क्रीडा शिक्षणालाही महत्व दिले असल्यामुळे जिल्हा परिषद शाळाअंतर्गत प्रत्येक समूह साधन केंद्रासाठी एक क्रीडा शिक्षक नेमण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण ४,८६० समूह साधन केंद्रे आहेत, केंद्र स्तरावर प्रत्येकी एक क्रीडा शिक्षकाचे पद मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यात एकूण १३६ समूह केंद्रे असून उक्त आदेशानुसार शासनाने प्रत्येक समूह साधन केंद्रासाठी क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) केंद्र स्तरीय विशेष शिक्षक (क्रीडा) या ४८६० पदांचा समावेश असलेल्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम, व सेवाशर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानंतर भरती व नियुक्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता ३२ विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे अनुसूचित जमातीच्या कोटयातून प्रवेश घेतल्याबाबत

**(८) * ८५२५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय,अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र (फार्मसी) यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता ३२ विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्रे सादर करुन अनुसूचित जमातीच्या कोटयातून प्रवेश घेतला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमाती कोट्यातून प्रवेश घेतलेल्या संबंधित विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रांची सखोल छाननी/तपासणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बनावट जात वैधता प्रमाणपत्रे कोणत्या जात प्रमाणपत्र छाननी समितीच्या (Scrutiny Committee) नावाने अथवा स्वाक्षरीने तयार करण्यात आली होती, तसेच बनावट प्रमाणपत्र तयार करणारे रॅकेट किती काळापासून कार्यरत आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बनावट जात वैधता प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश घेतलेल्या ३२ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याबाबत व त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच बनावट जात वैधता प्रमाणपत्रे देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या विनंतीनुसार, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि वैद्यकीय या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांचे जमात वैधता प्रमाणपत्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस उपलब्ध करुन दिले होते. त्यापैकी ३२ उमेदवारांची जमात वैधता प्रमाणपत्रे बोगस असल्याचे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास कळविण्यात आले. सदर ३२ उमेदवारांची बोगस प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याकरीता संबंधित संचालनालयांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने कळविले होते. तद्नंतर दिनांक ०९/०२/२०२६ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सदर ३२ उमेदवार प्रवेशित असलेल्या संस्थांबरोबर ऑनलाईन पध्दतीने बैठक घेण्यात आली असून, आपली बाजू मांडण्याकरीता नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाला अनुसरुन उमेदवार, पालक आणि संस्था यांना पुढील सात दिवसात खुलासा सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. सदरील उमेदवार, पालक आणि संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या खुलाशानुसार बहुतांश विद्यार्थ्यांनी जमात वैधता प्रमाणपत्रे विविध एजंटकडून अतिरिक्त पैसे देवून प्राप्त करुन घेतले आहेत. सदर प्रकरणी महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन), २०१५ मधील कलम ९(१)(दोन) मधील तरतूदीनुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचे प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/०२/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आले असून, त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पीक कर्ज वसूलीच्या स्थगितीतून ठाणे व पालघर जिल्हा वगळण्यात आल्याबाबत

**(९) * ८५४० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टीच्या संकटातून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी राज्य शासनाने दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार पीककर्ज वसुलीस स्थगिती दिल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थगिती आदेशामध्ये २९ जिल्ह्यांतील २८२ तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून त्यापैकी २५१ तालुके पूर्णतः बाधित व ३१ तालुके अंशतः बाधित घोषित करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे व पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होऊन भात पिकाचे मोठे नुकसान झाले असतानाही या पीककर्ज वसूलीच्या स्थगितीच्या निर्णयातून ठाणे व पालघर जिल्हा वगळण्यात आला असून येथील हजारों शेतकऱ्यांना तातडीने पीककर्जाची परतफेड करावी लागत असल्याने त्यांना लाखो रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ठाणे व पालघर जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता सदर जिल्ह्यांचा पीक कर्ज वसूली स्थगितीमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

महसूल व वन विभागाने सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे सवलतीसाठी बाधित तालुके घोषित करण्याबाबत दिनांक १०/१०/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यातील विविध तालुक्यांमध्ये माहे जून ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन २५१ पूर्णत: व ३१ अंशत: प्रभावित झालेले तालुके आपत्तीग्रस्त म्हणुन घोषित करण्यात आले आहेत.

(३) व (४) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत ठाणे व पालघर जिल्ह्यात खरीप २०२५ च्या हंगामात वितरीत केलेल्या पीक कर्जाच्या परतफेडीस दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत मुदत आहे. तसेच व्यापारी बँकांमार्फत वितरीत केलेल्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी वितरणापासून एक वर्षाचा आहे.

ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची दिनांक २८/०२/२०२६ अखेर पीक कर्जाची वसुली १३.९० टक्के आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक कर्जाची तातडीने परतफेड करावी लागते अशी वस्तुस्थिती नाही.

महसूल व वन विभागाने दिनांक १०/१०/२०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये ठाणे जिल्ह्याचा बाधित जिल्हा म्हणुन व पालघर जिल्ह्यातील उर्वरित तालुके बाधित तालुके म्हणुन घोषीत केल्यास शासन परिपत्रक दिनांक २६/११/२०२५ मध्ये ठाणे जिल्ह्यातील व पालघर जिल्ह्यातील उर्वरित

तालुक्यातील पीक कर्ज वसुलीस स्थगिती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील ६ समुह शाळा तयार करण्याबाबतचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(१०) * ८५४९ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील एकूण १५ शाळांचे ६ समूह शाळां तयार करण्याबाबत दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद वर्धा यांनी निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णय गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्कांवर प्रतिकूल परिणाम करणारा असल्याने रद्द करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील १५ शाळांचे ६ समूह शाळा तयार करण्याबाबतचा निर्णय रद्द करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी निवेदनाव्दारे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.वर्धा यांनी पी.एम.श्री.योजनेच्या धर्तीवर समूह शाळा निर्माण करणेच्या अनुषंगाने दिनांक १९/०१/२०२६ रोजी बैठक आयोजित केली होती. परंतु, सदर बैठकीमध्ये समूह शाळा निर्माण करणेबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(२) निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) व (४) समूह शाळांना मान्यता देण्याबाबत कोणताही निर्णय शासन स्तरावरून घेण्यात आलेला नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरील बंदी उठविणेबाबत

**(११) * ८५८१ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर घालण्यात आलेली बंदी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये उठविण्यात आली असून, शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर शिक्षण संचालकांच्या दिनांक २८ मे, २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये बंदी घालण्यात आली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सर्वच अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे अध्यापनाचे कार्य बाजूला ठेवून शिक्षकांना प्रशासकीय व शिक्षकेतर स्वरूपाची कामे करावी लागत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच ज्या संस्थांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ नंतर पदे भरली आहेत त्यांना नियुक्तीच्या मूळ तारखेपासून मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) शिक्षण संचालक (माध्यमिक) यांच्या दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवर बंदी लादण्यात आली नसून संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली आहे.
(२) व (३) शासन निर्णय, दिनांक २८/०१/२०१९ अन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतिबंध लागू करण्यात आला होता.त्याचप्रमाणे दिनांक ०७/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतिबंध लागू केल्यामुळे संभाव्य व्यपगत पदे, अतिरिक्त पदे, समावेशन इत्यादीबाबतच्या अटी, शर्ती व कार्यपध्दती विहित करण्यात आली होती. या दोन्ही शासन निर्णयांना मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने यानुसार कार्यवाही करता आली नाही. सदर स्थगिती मा.उच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर आकृतिबंध व विहित कार्यपध्दतीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत दिनांक २१/०२/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले होते. त्यानंतरच्या कालावधीत दिनांक ०७/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेली समायोजनाची पूर्व अट व इतर अटी व शर्ती यांची पूर्तता करुन शिक्षकेतर पदावर नियुक्ती देण्यात आली आहे किंवा कसे याची खातरजमा करुन मान्यतेबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

दिनांक ०४/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत शिक्षकेतर संवर्गातील पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली होती. यास उपरोक्त दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

दिनांक ३१/१०/२०२२ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार शिक्षकेतर पदभरतीस मान्यता देण्यात आली होती हा दावा वस्तुस्थितीवर आधारीत नाही. सद्य:स्थितीत शिक्षकेतर संवर्गातील विविध पदांवर नियुक्तीसाठीची किमान अर्हता सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असून त्यानंतर याबाबत निर्णय घेण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील २७३ शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेस स्थगिती दिल्याबाबत

**(१२) * ८५९२ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात प्राथमिक शिक्षण विभागातील १८४ व माध्यमिक शिक्षण विभागातील ८९ असे एकूण २७३ शिक्षक अतिरिक्त ठरले असून, शासनाने अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन दिनांक ५ डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते, मात्र सदर समायोजन प्रक्रियेस शासनाने स्थगिती दिली असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी नवीन आदेश जारी करून सन २०२५-२६ मधील संच मान्यता अंतिम झाल्यानंतरच समायोजनाची प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले असल्याने, संबंधित शिक्षकांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यातील २७३ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना पटसंख्येअभावी शाळा बंद न करता त्या शाळा पूर्ववत सुरू ठेवाव्यात अशी मागणी संबंधित ग्रामस्थ व पालकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने २७३ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे. सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार सांगली जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण विभागातील १८३ व माध्यमिक शिक्षण विभागातील ८९ असे एकूण २७२ शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत.
(२) व (३) आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्या दिनांक २९ नोव्हेंबर,२०२५ रोजीच्या पत्रान्वये सन २०२५-२६ च्या संच मान्यता अंतिम झाल्यानंतर विहित कार्यपध्दतीनुसार समायोजनाची प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(४) सन २०२५-२६ ची संचमान्यता अंतिम करण्याची कार्यवाही सुरु असून त्यानंतर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य केल्याबाबत

**(१३)** * **८६०४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक १३ फेब्रुवारी २०१३ रोजी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात शासन निर्णय जाहीर करून धोरणात्मक निर्णय घेतला असून सदर निर्णयात कोणताही बदल करण्यात आलेला नसतानाही शालेय शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी राज्यातील सर्व सेवेत कार्यरत शिक्षकांना टीईटी अनिवार्य असल्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना पत्र दिल्यामुळे शिक्षकांमध्ये संभ्रमाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवेत कार्यरत शिक्षकांना टीईटी ही शैक्षणिक पात्रता अनिवार्य नसतानाही शालेय शिक्षण विभागाने शासनच्या निर्णयाविरुध्द भूमिका घेतली आहे, तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ सप्टेंबर

२०२५ रोजी दिलेला टीईटी संदर्भातील निर्णय हा केंद्र शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने असून सदर प्रकरण मुख्य न्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील सात सदस्यीय घटनापीठाकडे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजीचा निर्णय प्रलंबित असतानाही सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांना टीईटी अनिवार्यतेबाबत परिपत्रक काढणे हे कायदेशीरदृष्टया अयोग्य ठरत असल्याने सदर आदेशामुळे शिक्षकांमध्ये मानसिक ताण, असुरक्षितता व आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेला टीईटी संदर्भातील निर्णय प्रलंबित असतानाही सेवेत कार्यरत शिक्षकांना टीईटी ही शैक्षणिक पात्रता अनिवार्य असल्याबाबतचे परिपत्रक रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्यतेबाबत पारीत केलेला दिनांक ०१/०९/२०२५ रोजीचा न्यायनिर्णय सर्व बिगर अल्पसंख्यांक प्राथमिक शाळांना लागू आहे. अल्पसंख्यांक शाळांच्या बाबतीत टीईटी अनिवार्यतेबाबतचा निर्णय सात सदस्यीय घटनापीठाकडे सोपविण्याची शिफारस करण्यात येईल असे उपरोक्त दिनांक ०१/०९/२०२५ रोजीच्या न्यायनिर्णयात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे टीईटी अनिवार्यतेबाबतचा निर्णय सरसकट घटनापीठाकडे सोपिवण्यात आल्याचा दावा वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय अधिनियमाइतकाच प्रभावी असल्याने प्रस्तुत न्यायनिर्णयाची अंमलबजावणी बंधनकारक आहे. शालेय शिक्षण विभागाने पदोन्नतीसाठी टीईटी अनिवार्य असल्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना दिलेले पत्र राज्याच्या विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार दिलेले आहे. ही सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, शालेय शिक्षण विभागाने केलेली कार्यवाही कायदेशीर दृष्टया अयोग्य आहे, असा दावा वस्तुस्थितीवर आधारीत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुही (जि.नागपूर) येथील आंभोरा खुर्द येथील शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) * ८६२३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुही (जि.नागपूर) येथील आंभोरा खुर्द जिल्हा परिषद शाळेत मुख्यमंत्री युवा कौशल्य योजनेंतर्गत २६ शिक्षकांची पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्याची बाब दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेतील मंजूर पदसंख्या व कार्यरत शिक्षकांची संख्या किती आहे व शिक्षकांअभावी इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तात्पुरती शिक्षक नियुक्ती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती अथवा अन्य पर्यायी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या २६ उमेदवारांची सेवा कुही तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती. ११ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला असल्याने या उमेदवारांची सेवा संपुष्टात आलेली आहे.
(२) व (३) कुही तालुक्यातील आंभोरा खूर्द जिल्हा परिषद शाळेत २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार इयत्ता १ ली ते ५ वी करीता ३ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद रिक्त आहे. रिक्त असलेल्या पदावर जिल्हा परिषद सेस फंडातून तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक स्वयंसेवक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. इयत्ता ६ वी ते ८ वी करीता २ पदे मंजूर असून त्यापैकी १ पद रिक्त आहे. सन २०२५-२६ ची संचमान्यता पूर्ण झाली असून समायोजनाची प्रक्रिया पार पाडली जात आहे. समायोजनातून तात्पुरती नेमणूक करण्यात आलेल्या पदावर व रिक्त असलेल्या पदावर नेमणूक करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी विद्यापीठे व संस्थाना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत आणण्याबाबत

**(१५) * ८६२५ श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही खाजगी विद्यापीठे व शैक्षणिक संस्था या सध्या शुल्क नियामक प्राधिकरण (Fee Regulatory Authority – FRA) यांच्या प्रत्यक्ष कक्षेत येत नाहीत, अशा खाजगी विद्यापीठे व संस्थांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यमान कायदे व नियमांनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाला स्पष्ट अधिकार प्रदान करणारी तरतूद अस्तित्वात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा संस्थांकडून विविध अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व खाजगी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत स्पष्टपणे आणण्यासाठी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क नियमन) अधिनियम अथवा संबंधित विद्यापीठ अधिनियम/नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व खाजगी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कक्षेत आणण्यासाठी संबंधित अधिनियम/नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत व प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याबाबत

कोणती कार्यवाही केली तसेच सदर प्रस्ताव अंमलात आणण्यासाठी ठरविण्यात आलेली कालमर्यादा काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील खाजगी विद्यापीठे महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ नुसार कार्यरत आहेत. सदर अधिनियमातील कलम ४२ मध्ये विद्यापीठास, विविध पाठ्यक्रमांसाठी शुल्क संरचना ठरविण्याकरीता शुल्क निश्चिती समिती घटित करण्याची तरतुद आहे. अशा प्रकारे खाजगी विद्यापीठांच्या शुल्क निश्चितीकरीता स्वतंत्र समितीची उपरोक्त अधिनियमातील कलम ४२ नुसार तरतुद असल्याने ती विद्यापीठे शुल्क नियामक प्राधिकरण (Fee Regulatory Authority-FRA) च्या कक्षेत येत नाहीत.
(२) अंशत: खरे आहे.

काही खाजगी विद्यापीठांविरुध्द शुल्कावाढीची तक्रार प्राप्त झालेली आहे. त्याबाबत विद्यापीठाकडून खुलासा मागविण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या कांदा पिकाला उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्यासाठी सर्वकष कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(१६) * ६७४० श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्यासाठी राज्य शासनाकडून एक स्ट्रॅटेजी प्लॅन तयार करून कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी केंद्र शासनाकडे बैठक घेण्याचे पणन मंत्री महोदयांनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजी घोषित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घेवून केंद्र शासनाकडे जाण्यासाठी सर्वंकष कृती आराखडा तयार करण्याकरीता राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्याचे कृषी मंत्री महोदय यांच्यासह केंद्रीय अन्न व ग्राहक व्यवहार मंत्री व केंद्रीय कृषीमंत्री यांची नवी दिल्ली येथे दिनांक ०७/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष भेट घेण्यात आली. सदर भेटीत नाफेड व एनसीसीएफ यांनी थेट शेतकऱ्यांकडून बाजार समितीतून कांदा खरेदी करावा, मध्यस्थांची भूमिका कमी करावी, सन २०२५-२६ मध्ये ५ लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करावा, कांदा थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करून डिबिटी (DBT)प्रणालीद्वारे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावेत, ही खरेदी प्रक्रिया पारदर्शकरित्या व्हावी यासाठी स्वतंत्र लेखापरीक्षक पथकाची नेमणूक करावी, यासह किरकोळ बाजारात कांद्याचा दर ४०-४५

रुपये किलोपर्यंत गेला तरच निर्यात शुल्क लावावे, जेणेकरून आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळू शकेल अशा प्रमुख मागण्या केल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक विभागातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे लाभ मिळवून देण्याबाबत

**(१७)** * **८०७७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ नियुक्ती दिनांकापासून १२ वर्षांची वरिष्ठ वेतनश्रेणी व २४ वर्षांची निवड वेतनश्रेणी तसेच सेवा ज्येष्ठतेचे आर्थिक व सेवाविषयक लाभ देणेची तरतूद असून, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी राज्यातील मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर या पाच विभागांत करण्यात आली असून, नाशिक विभागातील कर्मचाऱ्यांना या लाभांपासून वंचित ठेवण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर या पाच विभागांत सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी होऊन कर्मचाऱ्यांना फरकासह लाभ प्रदान करण्यात आले असताना, नाशिक विभागात प्रशासकीय स्तरावर होत असलेल्या दिरंगाईमुळे नियमांचे उल्लंघन होत असून याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार पत्रव्यवहार करूनही नाशिक विभागातील कर्मचाऱ्यांना अद्याप न्याय मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक विभागातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना उक्त शासन निर्णयानुसार लाभ न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने नाशिक विभागातील कर्मचाऱ्यांना त्वरित लाभ मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात शासन निर्णयांची सर्व विभागांत एकाच वेळी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने कोणत्या धोरणात्मक सुधारणा केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, अंशत: खरे आहे.

या विभागाच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची पुणे, अमरावती व नागपूर या तीन विभागात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.
(२) व (३) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम क्र.३९ मध्ये नियम क्र.११, १४, २० व ४४ च्या अधिन राहून वेतनवाढी अनुज्ञेय ठरविण्याची तरतूद आहे. सदर तरतुदींच्या अनुषंगाने नाशिक विभागाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत मार्गदर्शनार्थ सादर केलेल्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम क्र. ३९ मध्ये नियम क्र. ४४ च्या अधिन राहून वेतनवाढी अनुज्ञेय ठरविण्याची तरतूद आहे. दिनांक १६/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयात कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम क्र.३६ व ३९ नुसार वेतनवाढ अनुज्ञेय करावयाची आहे. त्याअनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या जात व पोटजातींच्या नोंदी करताना त्रुटी आढळून आल्याबाबत

**(१८) * ८३२३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या जात व पोटजातींच्या नोंदी करताना गंभीर त्रुटी आढळून आल्याने ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाने सर्व शासकीय, निमशासकीय आणि खाजगी शाळांना तात्काळ नोंदी दुरुस्त करण्याचे निर्देश दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीच्या नामाभिधानामुळे विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असून जिल्हानिहाय व तालुकानिहाय अशा प्रकारच्या किती चुकीच्या नोंदी आढळून आल्या आहेत, तसेच सदर किती प्रकरणांमध्ये चुकीच्या नोंदी दुरुस्त करण्याबाबत कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, जात नोंदीतील त्रुटी पुन्हा होऊ नयेत यासाठी शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या जात व पोटजातींच्या नोंदी करण्याबाबत शासनाने कोणती मार्गदर्शक तत्वे किंवा सुधारित कार्यपध्दती निश्चित करुन, ठाणे जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खाजगी शाळांना तात्काळ नोंदी दुरुस्त करण्याबाबत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भविष्यात आदिवासी विद्यार्थांचे नुकसान होऊ नये व त्यांच्या जातीच्या व पोटजातीच्या नोंदी योग्यप्रकारे करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने दिनांक १२ जानेवारी, २००० च्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत, परंतु २३ मे, २००० च्या शासन परीपत्रकान्वये पूर्वीचे शासन परिपत्रक रद्द करण्यात आले आहे. ठाणे जिल्हा परिषद शिक्षण या कार्यालयाकडून निर्गमित केलेले दिनांक २३/१२/२०२५ रोजीचे पत्र दिनांक २४/१२/२०२५ च्या पत्राद्वारे रद्द करण्यात आले आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या नोंदी अचूक होण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेतील कलम (२६) मध्ये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत, तसेच विद्यार्थ्यांच्या नोंदी मध्ये झालेल्या चूकाबाबत विद्यार्थी शाळेत असतानांच प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व माध्यमिक शाळेत शिकत

असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नोंदीबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना दुरुस्तिचे अधिकार देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्ता प्रयोगशाळा निर्माण करण्याबाबत

**(१९)** * **८३५५ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद क्षेत्रात १५०० हून अधिक शाळा असून, विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून, त्यासाठी जिल्ह्यातील ५० शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच धर्तीवर राज्यातील सर्व प्रकारच्या शासकीय व अनुदानित शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी आवश्यक ते आर्थिक अनुदान, पायाभूत सुविधा व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत १५०० च्यावर शाळा असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जिल्हा परिषद सेस फंड सन २०२५-२६ अर्थसंकल्पात १३ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ४८ शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) प्रयोगशाळा निर्माण करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२५-२६ मधून २ AI Lab On Wheel स्थापित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(२) सद्य:स्थितीत शालेय शिक्षण विभागांतर्गत शासनस्तरावर या संदर्भात प्रस्ताव विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रात्रशाळा बंद न करण्याबाबत

**(२०)** * **८५८२ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रात्रशाळांमध्ये दिवसा होस्टेल्स, लघुउद्योग, बांधकाम क्षेत्र तसेच अन्य ठिकाणी श्रमाचे काम करणारे युवक व युवती रात्री शिक्षण घेण्यासाठी रात्रशाळांमध्ये प्रवेश घेतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक परिस्थितीमुळे वंचित राहिलेल्या युवक-युवतींना शिक्षणाची संधी देणाऱ्या मुंबईतील १२ रात्रशाळांना एकही शिक्षक मंजूर करण्यात आलेला नसून, ४२ रात्रशाळांना केवळ १ शिक्षक मंजूर करण्यात आल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसा श्रमाचे काम करणाऱ्या युवक-युवतींची शिक्षणाची सुविधा कोणत्याही परिस्थितीत बंद होऊ नये, या सामाजिक दृष्टीने महत्त्वाच्या उद्देशाने शासनाने सदर रात्रशाळांना वर्गसंख्येनुसार आवश्यक तेवढे शिक्षक मंजूर करण्याबाबत अथवा रात्रशाळांसाठी स्वतंत्र व शिथिल धोरण स्वीकारण्याबाबत विचार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर धोरण आखण्याच्या दृष्टीने शिक्षक मंजुरीचे निकष, शिक्षक मंजुरीचे दिवस व शाळा-निहाय लागू असलेले सध्याचे निकष व रात्रशाळांसाठीचे निकष यामध्ये आवश्यक बदल करण्याचा निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या संचमान्यता धोरणानुसार मुंबईतील काही शाळा शून्य शिक्षकी व काही शाळा एक शिक्षकी झाल्या आहेत.
(३) व (४) रात्रशाळांबाबत दिनांक १७/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले होते. सदर धोरण दिनांक ३०/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले असून सुधारित धोरण लागू करण्यात आले आहे. या दोन्ही धोरणाबाबत दोन स्वतंत्र मतप्रवाह आहेत. त्यामुळे रात्रशाळांबाबत सर्वंकष धोरण नव्याने निश्चित करण्यात येत आहे. सदर धोरणात संच मान्यता, कामाचे तास, पदभरती व समायोजन इत्यादीबाबत योग्य त्या तरतूदी स्पष्टपणे करण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये भौतिक सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२१)** * **८६२६ श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विद्यापीठांची संलग्नता प्राप्त असूनही आवश्यक भौतिक सुविधा, पात्र अध्यापकवर्ग, प्रयोगशाळा/ग्रंथालय व्यवस्था व किमान विद्यार्थीसंख्या उपलब्ध नसतानाही केवळ कागदोपत्री अस्तित्वात असलेली काही महाविद्यालये कार्यरत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या तीन शैक्षणिक वर्षांत अशा प्रकारची किती महाविद्यालये संबंधित विद्यापीठे/शासनाच्या तपासणीत आढळून आली आहेत, त्याची विद्यापीठनिहाय व जिल्हानिहाय माहिती काय आहे,
(३) असल्यास, विद्यापीठांची संलग्नता प्रदान करताना व नूतनीकरण करताना शासनाने व विद्यापीठांनी ठरविलेले निकष (भौतिक सुविधा, कायमस्वरूपी अध्यापकवर्ग, विद्यार्थीसंख्या, पायाभूत सुविधा इ.) अनिवार्य असताना, सदर निकषांचे पालन न करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने संबंधित विद्यापीठांना निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भौतिक सुविधा, अध्यापकवर्ग व किमान विद्यार्थीसंख्या उपलब्ध नसतानाही केवळ कागदोपत्री अस्तित्वात असलेल्या किती महाविद्यालयांची संलग्नता रद्द/स्थगित करण्यात आली आहे व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील काही विद्यापीठांशी संलग्नित काही महाविद्यालयांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा, पात्र अध्यापकवर्ग, प्रयोगशाळा/ग्रंथालय व्यवस्था व किमान विद्यार्थीसंख्या उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२)

| **अ. क्र.** | **विद्यापीठाचे नाव** | **जिल्हा** | **तपासणी दरम्यान विद्यापीठांची संलग्नता प्राप्त असुनही आवश्यक भौतिक सुविधा पात्र अध्यापक वर्ग, प्रयोगशाळा/ ग्रंथालय व्यावस्था व किमान विद्यार्थीसंख्या उपलब्ध नसलेली महाविद्यालयांची संख्या.** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **२०२३-२४** | **२०२४-२५** | **२०२५-२६** |
| १ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.** | छत्रपती संभाजीनगर | ० | ० | ७ |
| | | जालना | ० | ० | ५ |
| | | बीड | ० | ० | २ |
| | | धाराशिव | ० | ० | ३ |
| | | **एकूण** | **०** | **०** | **१७** |
| २ | **गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** | गडचिरोली | ० | ० | ३ |
| | | चंद्रपूर | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **०** | **०** | **३** |
| ३ | **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** | जळगाव | १ | १ | १ |
| | | धुळे | २ | २ | २ |
| | | नंदूरबार | ० | ० | ० |
| | | **एकूण** | **३** | **३** | **३** |
| ४ | **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.** | अमरावती | ० | १ | ० |
| | | अकोला | ० | १ | ० |
| | | बुलढाणा | २ | ० | २ |
| | | यवतमाळ | ० | १ | ० |
| | | वाशिम | ० | १ | ० |
| | | **एकूण** | **२** | **४** | **२** |
| ५ | **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर** | नागपूर | १८ | १ | ३ |
| | | भंडारा | ३ | १ | ० |
| | | गोंदिया | २ | ० | ० |
| | | वर्धा | ४ | ० | ० |
| | | **एकूण** | **२७** | **२** | **३** |
| ६ | **श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई** | | ३४ | ५७ | ५७ |
| | | **एकूण** | **३४** | **५७** | **५७** |
| | | **सर्व विद्यापीठे एकूण** | **६६** | **६६** | **८५** |

(३) व (४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०८ अन्वये संलग्नीकरण आणि मान्यता यांकरीता शर्ती विहित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, कलम ११७ अन्वये

महाविद्यालयाचे व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची तपासणी व अहवालाबाबत आणि कलम १२० अन्वये संलग्नीकरण आणि मान्यता काढून घेणे याबाबत तरतूद विहित करण्यात आलेली आहे. अधिनियमातील सदर तरतुदीनुसार जी महाविद्यालये शासन निकषांची पूर्तता करीत नाहीत त्या महाविद्यालयांसदर्भात विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्यात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाशी संलग्नीत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये भौतिक सुविधा उपलब्ध नसलेल्या एकूण ५१ महाविद्यालयातील १९२ अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता शुन्य करण्यात आलेली आहे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये भौतिक सुविधा उपलब्ध नसलेल्या एकूण ५१ महाविद्यालयातील ९० अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता शुन्य करण्यात आलेली आहे. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक, जि.नागपूर या विद्यापीठाशी संलग्नीत भौतिक सुविधा उपलब्ध नसलेल्या ५ महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रदान करण्यात आलेले नाही. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठाशी संलग्नीत भौतिक सुविधा उपलब्ध नसलेल्या ३ महाविद्यालयांची संलग्नता २०२६-२७ पासून रदद करण्यात आलेली आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठांशी संलग्नीत भौतिक सुविधा उपलब्ध नसलेल्या महाविद्यालयांविरूध्द असंलग्निकरणाची कार्यवाही विद्यापीठामार्फत सुरू करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांतील अतिरिक्त ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यकांचे वेतन सुरु ठेवण्याबाबत

**(२२) * ८५८३ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अनेक ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक अतिरिक्त ठरले असून, त्यांना अद्याप अन्यत्र समायोजित करण्यात आले नसल्याचे माहे फेब्रुवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अतिरिक्त ठरलेल्या ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यकांचे वेतन देयक सादर करू नये, अशा सूचना वेतन पथक अधिकाऱ्यांनी संबंधित शाळांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली १९८१ नियम क्रमांक २६ नुसार ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक यांना वेतन व सेवासुरक्षेचे संरक्षण देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोणत्याही अतिरिक्त शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अन्यत्र समायोजन होईपर्यंत त्यांच्या मूळ शाळेतून त्यांचे वेतन सुरूच राहण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन मूळ शाळेतून सुरु ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.